◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

NEED24 NEWS
हर ख़बर, हर शहर

नीड 24 न्यूज़

हर खबर, हर शहर

◆ ADVT ◆
येथे जाहिरात द्या
98700 06472 · need24.digital

DIGITAL E-PAPER

PRGI APPLICATION
UNDER PROCESS
Application No.
T/GJ/2026/0619/2304/1577

GST
GSTIN
24CINPG0564Q1ZT

UDYAM REGISTERED
UDYAM-GJ-14-0003714

◆ DIGITAL NEWS NETWORK ◆
भारताचे विश्वासार्ह बहुभाषिक डिजिटल न्यूज नेटवर्क
11+ Languages | 24×7 Live | e-Paper Daily

आमचे App डाउनलोड करा
Download on the App Store
GET IT ON Google Play

www.need24.digital
info@need24.in
+91 98700 06472
FOLLOW US:

तेज़ | सटीक | निष्पक्ष | जनहित में | सच की आवाज़ | जन-जन की आवाज़ | निडर पत्रकारिता

MAHARASHTRA | नीड 24 न्यूज़ · हर खबर, हर शहर | 24 नवम्बर 2026

अपराध

चंद्रपुरातील स्नेहा फूड्सवर आयकराची धाड; तीन ठिकाणी तपासणी सुरू



आयकर विभागाने चंद्रपुर शहरात स्थित स्नेहा फूड्सवर अचानक धाड लावली. या कारवाईत विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यवसायाच्या आर्थिक नोंदींची तपासणी करण्यासाठी सखोल छाननी सुरू केली.

धाडीत एकूण तीन ठिकाणी तपासणी केली गेली, ज्यात उत्पादन कारखाना, साठवणुकीचे गोदाम आणि विक्री केंद्र यांचा समावेश होता. अधिकाऱ्यांनी नोंदींची सखोल तपासणी, चलनांची पडताळणी व संभाव्य करभरणीचे उल्लंघन शोधण्याचा प्रयत्न केला.

तपासणी चालू असल्यामुळे स्नेहा फूड्सचे व्यवस्थापन आणि संबंधित पक्षांकडून अधिक माहिती मिळविण्याची प्रक्रिया सुरू आहे. आयकर विभागाने पुढील कारवाईसाठी आवश्यक पुरावे गोळा केल्यानंतर योग्य कारवाई करणार असल्याचे सांगितले.

— Doctor Pintu Paul

सावंगा जहांगिर गावाला स्वातंत्र डीपी विद्युत पुरवठा नाहीतर टँकरने पाणी देण्यात यावे मा.कार्यकारी अभियंता वाशिम विभाग यांना निवेदन.



जिल्हा प्रतिनिधी:आज वाशिम जिल्ह्यातील सावंगा जहांगिर गावाला तात्काळ पाणी पुरवठा करण्यात यावा. या साठी आज रोजी वाशिम येथे जाऊन गावकऱ्यांनी मा.कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभागवाशिम यांना निवेदन देण्यात आले. या निवेदनात सांगितले की सावंगा जहांगिर या गावाला जल जीवन मिशन योजने मार्फत गावासाठी विहीर खोदण्यात आली असून तिला भरपूर प्रमाणात पाणी लागले असून. पाईप लाइन गावांपर्यंत करण्यात आली टाकी बांधण्यात आली टाकी च काम पूर्ण झाले या योजने मार्फत घरोघरी नळ देण्यात आले. पण पाणी गावा पर्यंत येण्यासाठी फक्त विज्कनेक्शन नाही व स्वतंत्र डीपी नाही या मुळे गावामध्ये मोठ्या प्रमाणात पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. नागरिकांना खूप दूर जावे लागत आहे पाणी आणण्यासाठी त्यातचउन्हातानात स्त्रियांनाया गंभीर समस्येचा सामना करावा लागत आहे.तात्काळ विद्युत पुरवठा देण्यात यावा.नवीन कनेक्षण. स्वतंत्र डीपी देण्यात यावी नेहमीच सुरळीत पाणीपुरवठा चालू ठेवण्यासाठी स्वतंत्र वीज द्यावी तोपर्यंत टँकरने पाणीपुरवठा पुरवण्यात यावा. अशी मागणी करण्यात आली असून. गावकरी पाण्याच्या टाकी असून चालू कधी होणार या विचारात आहेत. मा. कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणी पुरवठा विभाग वाशिम या वेळी निवेदन देण्यासाठी. अखिल भारतीय विकास विद्यार्थी परिषदचे श्रीकृष्ण भाऊ चोंडकर व प्रवीण भाऊ खिल्लारे दीपक आगलावे यशवंत गायकवाड व रामेश्वर गोदमले हे सर्वगावकरी निवेदन देण्यासाठी आले होते

— Rashtrapal Dilip Sarkate

कृषि

12 गावांच्या शेतकऱ्यांनी सुधीर भाऊंची भेट घेतली, MIDC विरोधात ठाम भूमिका



२३ नोव्हेंबर २०२६ रोजी गोंडपिपरी तालुक्यातील 12 गावांच्या शेतकऱ्यांनी सुधीर भाऊंच्या भेटीला मोठ्या प्रमाणात उपस्थित राहिले. शेतकऱ्यांनी स्पष्टपणे सांगितले की त्यांना कोणताही मोबदला नको; त्यांना फक्त आपली शेती व त्याचे संरक्षण हवे आहे. त्यांनी सुधीर भाऊंना विश्वास दिला की ते लाल दिव्याच्या गाडीसाठी नाही तर लाल रक्ताच्या माणसाच्या सेवेसाठी काम करतात, म्हणूनच त्यांच्यावर त्यांचा विश्वास आहे.

शेतकऱ्यांनी 32(2) च्या नोटीसचे वितरण सुरू असल्याचे नोंदवले आणि SDO कडे लेखी उत्तर दिले आहे, ज्यात MIDC प्रकल्पाविरुद्ध ठाम विरोध व्यक्त केला आहे. त्यांनी जनसुनावण्या देखील आयोजित केल्या – सध्या 6 गावांत जनसुनावण्या झाल्या आहेत, तर उर्वरित 6 गावांमध्ये अजूनही प्रक्रिया सुरू आहे. ग्रामपंचायत ठरावानुसार, शेतकऱ्यांनी एक कोटी रुपये मोबदला दिला तरी मान्य नाही, कारण त्यांचे उद्दिष्ट फक्त शेतीचे संरक्षण आहे.

शेतकरी प्रतिनिधींनी करंजी MIDC चे उदाहरण दिले. करंजी MIDC ला 35 वर्षे झाली असून 70 हेक्टर जमीन असूनही कोणताही उद्योग स्थापित होऊ शकला नाही. त्याचप्रमाणे 10,000 एकर जमीन असलेल्या त्यांच्या प्रदेशातही उद्योग येणार नाही, असे त्यांनी ठामपणे म्हटले. शेतकऱ्यांची भूमिका स्पष्ट आहे: "आम्ही 100% इथे उध्वस्त होऊ, विकास, उद्योग, रोजगार यांची गरज नाही, फक्त आमची शेती हवी आहे." त्यांनी सुधीर भाऊंना विनंती केली की या मुद्द्याला विधानसभेत मांडावे, कारण त्यांचे विश्वास आहे की एकदा विधानसभेत मांडल्यास MIDC प्रकल्प रद्द होईल. शेवटी शेतकरी प्रतिनिधीने सांगितले की ते कोणत्याही पक्षाचे असले तरी आयुष्यभर मरणपर्यंत सुधीर भाऊंच्या सोबत राहतील, फक्त MIDC रद्द होणे आवश्यक आहे.

— Doctor Pintu Paul

राजनीति

मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. किसनजी कथोरे यांना कॅबिनेट मंत्रिपद मिळावे; मुख्यमंत्र्यांना १० हजार पत्रे पाठवण्याची मोहीम सुरू.



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड

दिनांक २४/११/२०२६.

विशेष वृत्त ठाणे,

मुरबाड (प्रतिनिधी) : मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार श्री. किसनजी कथोरे यांना राज्य मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्रिपद देण्यात यावे, अशी आग्रही मागणी कार्यकर्ते आणि नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. मुरबाड मतदारसंघासह आजूबाजूच्या परिसराचा सर्वांगीण विकास अधिक वेगाने साधण्यासाठी ही मागणी करण्यात येत असून, त्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना तब्बल १०,००० पत्रे पाठवण्याचा अनोखा उपक्रम हाती घेण्यात आला आहे. आदर्श तायडे यांनी या पत्र मोहिमेसाठी पुढाकार घेतला असून, त्यांनी आपली ही भूमिका जाहीर केली आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून मुरबाड विधानसभा मतदारसंघातील जनतेच्या आणि कार्यकर्त्यांच्या भावना थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचवल्या जाणार आहेत.

"मुरबाड विधानसभा मतदारसंघाच्या आणि लगतच्या परिसराच्या विकासासाठी आमचे लोकप्रिय आमदार तथा 'आप्पा साहेब' श्री. किसनजी कथोरे यांना कॅबिनेट मंत्रिपद नक्कीच मिळेल, असा ठाम विश्वास आमच्या मनात आहे," असे आदर्श तायडे यांनी या मोहिमेदरम्यान म्हटले आहे. सध्या सोशल मीडियावरही '#आप्पांना_कॅबिनेट_मंत्री_पद_मिळालंच_पाहिजे' हा हॅशटॅग वापरून या मोहिमेचा जोरदार प्रचार सुरू करण्यात आला आहे.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

डॉ. राजेश्वर रेव्हर यांनी सोलापूरच्या संजीवनी हॉस्पिटलमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले



२६ नोव्हेंबर २०२६ रोजी सोलापूरच्या संजीवनी हॉस्पिटल, चडचण येथे डॉ. राजेश्वर रेव्हर यांनी मोफत आरोग्य तपासणी शिबिर आयोजित केले. हे शिबिर ज्योती संजीवनी (सरकारी योजना) अंतर्गत कर्नाटकातील बीपीएल कार्डधारक आणि परिसरातील नागरिकांना उपचार व मार्गदर्शन देण्यासाठी सुरू करण्यात आले आहे. शिबिरात BP (रक्तदाब), ECG, रक्तातील साखर, HB (हिमोग्लोबिन), ऑक्सिजन तपासणी आणि इतर आरोग्य तपासण्या मोफत उपलब्ध केल्या जातील. हृदयविकाराची संभाव्य लक्षणे जसे की छातीत दुखणे, हातात वेदना, थकवा, श्वास घेण्यास त्रास, घाम येणे आणि पायांमध्ये सूज यांवरही मार्गदर्शन केले जाईल.

सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शिबिर चालेल आणि सहभागींचे स्वागत करण्यात येईल. आयोजकांनी परिसरातील नागरिकांना या मोफत तपासणीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे.

अधिक माहितीसाठी व नोंदणीसाठी 7385777226 किंवा 9545277222 या क्रमांकावर संपर्क साधा. संदीप अष्टगी यांचा क्रमांक 9657410824 देखील उपलब्ध आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर

सरकारी योजना

अक्कलकुवा तालुक्यातील साकलीउमर येथे सिमेंट नाला गाळ काढणे कामाचा मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल (भाप्रसे) याचे हस्ते शुभारंभ दुष्काळ निवारण उपाययोजनांचा घेतला आढावा



अक्कलकुवा तालुक्यातील साकलीउमर येथे सिमेंट नाला गाळ काढणे कामाचा मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल (भाप्रसे) याचे हस्ते शुभारंभ दुष्काळ निवारण उपाययोजनांचा घेतला आढावा

अक्कलकुवा तालुक्यातील ग्राम पंचायत साकलीउमर येथे दिनांक २२ नोव्हेंबर २०२६ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल (भाप्रसे) यांनी भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांच्या हस्ते VB-G-RAM-G अंतर्गत सिमेंट नाला गाळ काढणे कामाचा शुभारंभ करण्यात आला

साठवून ठेवण्यास आणि जलसंधारणास मोठी मदत होणार असून त्याचा थेट फायदा स्थानिक शेती व ग्रामस्थांना मिळणार आहे.

या कार्यक्रमाप्रसंगी साकलीउमरचे सरपंच पंचायत समिती अक्कलकुवाचे गटविकास अधिकारी उप अभियंता (लसिवि) ग्रामपंचायतीचे पदाधिकारी ग्रामपंचायत सदस्य विस्तार अधिकारी (ग्राप) रोजगार सेवक, कुशल/अकुशल मजुर तसेच ग्रामस्थ उपस्थित होते

भेटीदरम्यान मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल यांनी गावातील संभाव्य दुष्काळ परिस्थिती बाबत सखोल चर्चा केली आणि उपाययोजनांचा आढावा घेतला जलसंधारण रोजगार हमीची कामे आणि पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजनांबाबत त्यांनी स्थानिक प्रशासन मार्गदर्शनपर सुचना केल्यांत

— Ashok Patil

धर्म

भव्य पायी दिंडी सोहळ्यात माजी उपाध्यक्ष सुभाष गोटीराम पवार यांची सदिच्छा भेट; वारकऱ्यांशी साधला आत्मीय संवाद



जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले (ठाणे सह)

तालुका रिपोर्टर किशोर पवार (मुरबाड)

दिनांक २४/११/२०२६

नीड २४ न्यूज | विशेष वार्तापत्र

मुरबाड (ठाणे प्रतिनिधी): ग्रामीण भागातील अध्यात्म आणि वारकरी संप्रदायाची थोर परंपरा जपणाऱ्या श्री क्षेत्र खांबलिंगेश्वर (म्हसा) ते श्री क्षेत्र गोरक्षनाथ मठ (चेरवली) या भव्य पायी दिंडी सोहळ्यास ठाणे जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष व ठाणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी संचालक श्री. सुभाष गोटीराम पवार यांनी सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी विठ्ठल-रुक्मिणीच्या चरणी नतमस्तक होत दर्शन घेतले आणि तालुक्याच्या सुख-समृद्धीसाठी व बळीराजाच्या कल्याणासाठी प्रार्थना केली.

ह.भ.प. श्री. रामभाऊ दळवी अण्णा यांच्या संकल्पनेतून आणि मार्गदर्शनाखाली या पायी दिंडी सोहळ्याचे अत्यंत नेटके व भव्य आयोजन करण्यात आले होते. श्री क्षेत्र खांबलिंगेश्वर म्हसा येथून प्रस्थान झालेल्या या दिंडीने विविध गावांमधून भक्तिमय वातावरणात मार्गक्रमण करत श्री क्षेत्र गोरक्षनाथ मठ चेरवली येथे मुक्काम केला. या संपूर्ण प्रवासात मुरबाड तालुक्यासह आसपासच्या परिसरातील असंख्य वारकरी बांधव, महिला व भाविक मोठ्या संख्येने आणि प्रचंड उत्साहाने सहभागी झाले होते.


या भेटीदरम्यान श्री. सुभाष पवार यांनी दिंडीत सहभागी झालेल्या सर्व वारकरी बांधवांशी अत्यंत आपुलकीने व आत्मीयतेने संवाद साधला, तसेच त्यांच्या प्रवासातील व मुक्कामाच्या ठिकाणच्या सोयीसुविधांची विचारपूस केली. टाळ-मृदंगाचा गजर, हरिनामाचा अखंड जप आणि 'ज्ञानोबा माऊली तुकाराम' च्या जयघोषाने संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता.

यावेळी बोलताना श्री. सुभाष गोटीराम पवार म्हणाले की, 'वारकरी संप्रदायाने समाजाला नेहमीच समतेचा, प्रेमाचा आणि एकोप्याचा संदेश दिला आहे. अशा भव्य पायी दिंडी सोहळ्यांमुळे ग्रामीण भागात आध्यात्मिक चैतन्य आणि सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. या सोहळ्यात सहभागी होऊन वारकरी बांधवांची सेवा करण्याची आणि विठुरायाचे दर्शन घेण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे.'

याप्रसंगी स्थानिक ग्रामस्थ, ज्येष्ठ नागरिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. या स्तुत्य उपक्रमाचे आयोजक ह.भ.प. रामभाऊ दळवी अण्णा व सर्व वारकरी बांधवांचे श्री. पवार यांनी मनापासून कौतुक करून त्यांच्या पुढील आध्यात्मिक वाटचालीस मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

— Kashinath Desale, ठाणे

बेल्हे येथे २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान 'बेल्हा लोककला सांस्कृतिक महोत्सव'; कला रसिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन



बेल्हे येथे २७ ते २९ नोव्हेंबर दरम्यान 'बेल्हा लोककला सांस्कृतिक महोत्सव'; कला रसिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन

२३ नोव्हेंबर २०२६

बेल्हे: दरवर्षीप्रमाणे याही वर्षी बेल्हे येथे भव्य 'बेल्हा लोककला सांस्कृतिक महोत्सवाचे' आयोजन करण्यात आले आहे. येत्या २७, २८ आणि २९ नोव्हेंबर रोजी हा तीन दिवसीय महोत्सव मोठ्या उत्साहात आणि आनंदात पार पडणार आहे. या महोत्सवासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या सर्व कला रसिकांना उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

— Anil Mallav, पुणे

स्वास्थ्य

बॉटल पाण्याची सुरक्षा प्रश्नात, व्हायरल व्हिडिओने उभे केले प्रश्न, FSSAI ने दिली कारवाईची सूचना



एक व्हायरल व्हिडिओमध्ये बॉटल पाण्याच्या सुरक्षिततेबद्दल गंभीर शंका उपस्थित केली असून, त्याने सामाजिक माध्यमांवर मोठी चर्चा निर्माण केली आहे.

व्हिडिओमध्ये बॉटल पाण्यात हानिकारक पदार्थ असू शकतात, किंवा उत्पादन प्रक्रियेत स्वच्छतेचा अभाव असल्याचा दावा केला आहे; हा दावा अनेक वापरकर्त्यांनी शेअर केला आणि प्रश्न उपस्थित केले.

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरण (FSSAI) ने या दाव्यांवर लक्ष ठेवून तपास सुरू करण्याची सूचना दिली आहे आणि आवश्यक असल्यास कडक कारवाई करेल, असे ते म्हणाले.

तज्ञांचे मत आहे की, मान्यताप्राप्त बॉटल पाणी ब्रँड्स नियमनांनुसार तयार केले जाते आणि सामान्यतः सुरक्षित असते; तरीही ग्राहकांनी लेबल व प्रमाणपत्र तपासून खरेदी करावी.

FSSAI ने जनतेला अनावश्यक घबराट टाळण्याचा सल्ला दिला असून, अधिकृत माहिती व मार्गदर्शक तत्त्वे उपलब्ध होताच सार्वजनिकरित्या जाहीर करेल.

— Doctor Pintu Paul

शिक्षा

सरळगाव विभाग हायस्कूलच्या १९७९-८० बॅचचा 'ऋणानुबंध' माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात संपन्न.



जिल्हा रिपोर्टर काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका रिपोर्टर किशोर पवार

दिनांक २४/११/२०२६.

विशेष वृत्त

ठाणे मुरबाड : सरळगाव विभाग हायस्कूल, सरळगाव येथील इयत्ता १० वी (एस.एस.सी.) बॅच सन १९७९-८० च्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा '॥ ऋणानुबंध ॥' रविवार, दि. २२ नोव्हेंबर २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता पोटगाव (ता. मुरबाड) येथील निसर्गाच्या सानिध्यात वसलेल्या चित्रांगण रिसॉर्ट येथे अत्यंत उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात पार पडला.

मान्यवर गुरुवर्यांच्या प्रमुख सानिध्यात हा सोहळा संपन्न झाला. या मेळाव्यासाठी विविध क्षेत्रांतून आणि महत्त्वाच्या हुद्द्यांवरून सेवानिवृत्त झालेले सुमारे ३० माजी विद्यार्थी (सवंगडी) तब्बल ४६ वर्षांनंतर पुन्हा एकदा एकत्र आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीपप्रज्वलनाने झाली. यानंतर सर्व उपस्थितांनी एकत्रितपणे उभे राहून शालेय प्रार्थना व प्रतिज्ञा म्हटली, ज्यामुळे शालेय काळातील आठवणींना उजाळा मिळाला. यावेळी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने गुरुवर्य कोठावले सर, वाघुळदे सर व उपस्थित सर्व शिक्षकांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन हृदयस्पर्शी सत्कार करण्यात आला.

निसर्गरम्य वातावरणात पार पडलेल्या या स्नेहमेळाव्यात भजन आणि अंताक्षरीचा बहारदार कार्यक्रम रंगला, ज्यात सर्वांनीच उत्स्फूर्त सहभाग घेतला. यानंतर उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मोलाचे बोधपर मार्गदर्शन केले व शुभाशीर्वाद दिले. तसेच, विविध पदांवरून निवृत्त झालेल्या माजी विद्यार्थ्यांनीही मनोगत व्यक्त करत जुने किस्से आणि शाळेने दिलेल्या संस्कारांचे महत्त्व सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी एकत्रितपणे स्नेहभोजनाचा आस्वाद घेतला. विशेष म्हणजे, पुढील वर्षीचा स्नेहमेळावा वांगणी येथे दिव्यांगांच्या सानिध्यात साजरा करण्याचा स्तुत्य संकल्प यावेळी सर्वानुमते करण्यात आला. शेवटी सर्वांनी एकमेकांना पुढील वाटचालीसाठी व उत्तम आरोग्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत या अविस्मरणीय सोहळ्याचा निरोप घेतला.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

आई-वडिलांकडे दुर्लक्ष? नवीन कायदा दरमहा ₹10,000 निर्वाह भत्ता आदेशित करतो



नवीन नियमांनुसार, महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने २००७ च्या अधिनियमाच्या अंतर्गत पालकांकडे दुर्लक्ष करणाऱ्या मुलांवर व नातेवाईकांवर दरमहा ₹10,000 पर्यंत निर्वाह भत्ता देण्याचे आदेश देण्याची व्यवस्था केली आहे. हा भत्ता प्रतिवादीच्या एकूण मासिक उत्पन्नाला कुटुंबातील व्यक्तींच्या संख्येने भागून येणाऱ्या रकमेपेक्षा जास्त असणार नाही.

अर्ज प्राप्त झाल्यानंतर न्यायाधिकरण प्रतिवादीला कारणे दाखवा नोटीस पाठवते. दोन्ही पक्षांच्या सहमतीने प्रकरण समेट अधिकाऱ्याकडे पाठवून परस्पर समेट साधण्याचा प्रयत्न केला जातो. जर प्रतिवादीने नोटीसला उत्तर दिले नाही किंवा सुनावणीच्या दिवशी अनुपस्थित राहिला, तर न्यायाधिकरण अर्जदाराच्या पुराव्यावर आधारित किंवा चौकशी करून एकतर्फी (Ex-parte) कारवाई करते आणि अर्ज निकाली काढते.

या कायद्याने आई-वडिलांना वाऱ्यावर सोडणाऱ्यांना आर्थिक व कायदेशीर जबाबदारी वाढवली आहे. दरमहा ₹10,000 चा निर्वाह भत्ता न दिल्यास प्रतिवादीवर कारवाई होऊ शकते.

पालकांची सेवा करणे आता फक्त संस्कार नाही, तर कायदेशीर बंधन बनले आहे.

— Doctor Pintu Paul, मुंबई

.लोकप्रिय आमदार मा. किसन कथोरे साहेबांचा पुन्हा एकदा विकासकामांचा धडाका; ग्रामीण प्रवाशांच्या सुविधेसाठी तब्बल १५ कोटींचा निधी मंजूर!.



जिल्हा प्रतिनिधी काशिनाथ देसले ठाणे सह

तालुका प्रतिनिधी किशोर पवार मुरबाड.

दिनांक २४/११/२०२६

विशेष ST निवारा शेड वृत्त

मुरबाड ठाणे :

मुरबाड / ठाणे (प्रतिनिधी) :

मुरबाड विधानसभा मतदारसंघाचा चेहरामोहरा बदलणारे आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी सदैव तत्पर असणारे लोकप्रिय आमदार मा. किसन शंकर कथोरे साहेब यांच्या विशेष आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांना पुन्हा एकदा मोठे यश आले आहे. ठाणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील एस.टी. प्रवाशांची वर्षानुवर्षे असलेली मोठी गैरसोय आता कायमची दूर होणार आहे. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एस.टी.) ठाणे विभागांतर्गत येणाऱ्या मुरबाड, अंबरनाथ, कल्याण, भिवंडी आणि शहापूर तालुक्यांतील ग्रामीण भागातील प्रवासी मार्गांवर एकूण २५ नवीन प्रवासी निवारा शेड (बस थांबे) उभारण्यासाठी तब्बल १५ कोटी रुपयांची (१५.०० कोटी) प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्राप्त झाली आहे.

प्रवाशांच्या व्यथा जाणून घेतला धडाकेबाज निर्णय:

ग्रामीण भागातून दररोज तालुक्याच्या किंवा शहराच्या ठिकाणी शिक्षण, नोकरी आणि व्यवसायानिमित्त ये-जा करणारे शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, कष्टकरी शेतकरी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य प्रवाशांना बसची वाट पाहताना कडक ऊन, सोसाट्याचा वारा आणि मुसळधार पावसाचा मोठा त्रास सहन करावा लागत होता. अनेक ठिकाणी निवारा नसल्याने प्रवाशांना उघड्यावर किंवा आजूबाजूच्या दुकानांचा आसरा घेऊन ताटकळत उभे राहावे लागत होते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन गावोगावच्या नागरिकांनी आणि प्रवासी संघटनांनी बस थांब्यांवर सुसज्ज निवारा शेड उभारण्याची मागणी केली होती.

आ. कथोरे साहेबांचा पाठपुरावा आणि प्रशासनाचे सहकार्य:

जनतेच्या या अत्यंत जिव्हाळ्याच्या प्रश्नाची तात्काळ दखल घेत लोकप्रिय आमदार मा. किसन कथोरे साहेब यांनी राज्य शासन आणि परिवहन महामंडळाकडे युद्धपातळीवर पाठपुरावा केला. तसेच, या कामांच्या तांत्रिक बाबी, जागेची पाहणी आणि स्थानिक पातळीवरील नियोजनात मुरबाड बस आगाराचे व्यवस्थापक मा. मुसळे साहेब यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. आ. कथोरे साहेबांच्या अथक प्रयत्नांना अखेर मोठे यश आले असून, तब्बल १५ कोटी रुपयांच्या निधीला प्रशासकीय व वित्तीय हिरवा कंदील मिळाला आहे.

मंजूर निधीतून या गावांमध्ये उभारले जाणार सुसज्ज निवारा शेड:

या मंजूर कामांमध्ये मुरबाड विधानसभा मतदारसंघातील आणि परिसरातील खालील प्रमुख गावांचा समावेश करण्यात आला आहे:

• मुरबाड तालुका (१२ गावे): म्हसा, सासणे, शिरवली, नारिवली, किशोर धसई, पोटगाव, मिल्हे, तुलई, खानिवरे, कोरावळे, शिवळे आणि उमरोली (बळेगाव).

• अंबरनाथ तालुका (११ गावे): रहाटोली, कासगांव, सोनावळे, येवे, पिंपळोली, बारवीडॅम, सांबारी, चरगांव, बोराडपाडा, कुडेरान आणि धारोळा.

• कल्याण तालुका: दहागाव.

या प्रमुख गावांसह भिवंडी आणि शहापूर तालुक्यातील इतर ग्रामीण भागांतील महत्त्वाच्या प्रवासी मार्गांवरही या निधीतून आधुनिक, मजबूत आणि सर्व सुविधांनी युक्त असे बस थांबा निवारा शेड उभारण्यात येणार आहेत.


सर्व स्तरांतून आ. कथोरे साहेबांचे अभिनंदन:

घेतलेल्या लोकप्रिय आमदार मा. किसन कथोरे साहेब यांच्या दूरदृष्टीमुळे आणि कार्यतत्परतेमुळे हा अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला आहे. या सुसज्ज निवारा शेडमुळे विशेषतः पावसाळ्यात आणि उन्हाळ्यात विद्यार्थ्यांचे, महिलांचे व वृद्धांचे होणारे हाल थांबणार असून, ग्रामीण प्रवाशांचा प्रवास अधिक सुखकर आणि सुरक्षित होणार आहे. या भरीव निधीबद्दल मतदारसंघातील नागरिक, प्रवासी संघटना आणि स्थानिक लोकप्रतिनिधींकडून आ. कथोरे साहेब तसेच आगार व्यवस्थापक मा. मुसळे साहेब यांचे मनःपूर्वक आभार मानत अभिनंदन केले जात आहे.

— Kashinath Desale, ठाणे

स्थानीय

दोन दिवसांची बहुजन आघाडीची संविधान सन्मान महासभा छत्रपती शिवाजी महाराज पार्क, मुंबई येथे



बहुजन आघाडीने दोन दिवसांची संविधान सन्मान महासभा आयोजित केली आहे. ही महासभा २५ नोव्हेंबर रोजी मुंबईतील दादर येथील छत्रपती शिवाजी महाराज पार्क येथे होणार आहे.

या कार्यक्रमात लाखो संख्येने उपस्थित राहण्याची विनंती सर्व कार्यकर्त्यांना केली आहे.

सर्व कार्यकर्ते घरी न बसता या संविधान सन्मान महासभा कार्यक्रमात सहभागी होण्याची विनंती करण्यात आली आहे.

आयोजकांनी या सभेच्या यशस्वी आयोजनाबद्दल आभार मानले आहेत. तसेच भविष्यातही अशा कार्यक्रमांना चालना देण्याची विनंती केली आहे.

— G. P. G. U. .7798377959, मुंबई

राजनीति

बाजार समितीच्या प्रशासकांच्या कारभाराची चौकशी; १५ दिवसांत वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करण्याचे आदेश! कोकण विभागीय उपनिबंधक आदिनाथ दगडे यांचे निर्देश; प्रशासक डॉ. मांडे यांच्या कारभाराची चौकशी होणार, बाजार समिती सदस्यांकडून समाधान व्यक्त.



नीड २४ न्यूज महाराष्ट्र

जिल्हा रिपोर्टर : श्री काशिनाथ देसले, ठाणे

तालुका रिपोर्टर : श्री किशोर पवार, मुरबाड

मुरबाड विशेष वृत्त | दिनांक : २३/११/२०२६

मुरबाड : कल्याण बाजार समितीच्या प्रशासकीय कारभाराबाबत महत्त्वपूर्ण घडामोड समोर आली असून, प्रशासक डॉ. मांडे यांच्या कारभाराविषयी वस्तुस्थितीदर्शक व स्वयंस्पष्ट अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. नवी मुंबई येथील सहकारी संस्था विभागाचे कोकण विभागीय उपनिबंधक आदिनाथ दगडे यांनी संबंधित अहवाल १५ दिवसांच्या आत कोकण विभागीय सहनिबंधकांकडे सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

या आदेशामुळे बाजार समितीच्या प्रशासकीय कामकाजाच्या चौकशीला महत्त्व प्राप्त झाले आहे. प्रशासकांच्या कारभाराबाबत नेमकी वस्तुस्थिती काय आहे, याचा तपशील संबंधित अहवालातून स्पष्ट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

चौकशी समितीच्या कार्यवाहीकडे सदस्यांचे लक्ष

वस्तुस्थितीदर्शक अहवाल मागविण्यात आल्याने बाजार समितीच्या सदस्यांमध्ये या निर्णयाबाबत समाधान व्यक्त करण्यात आले आहे. चौकशीच्या माध्यमातून प्रशासकीय कामकाजातील वस्तुस्थिती समोर यावी आणि संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पद्धतीने पार पडावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

या चौकशी समितीबाबत राज्याचे पणन संचालक कथोरे यांनाही माहिती देण्यात आली असल्याचे समजते. त्यामुळे या प्रकरणाकडे सहकार व पणन विभागाचे लक्ष असल्याचे दिसून येत आहे.

१५ दिवसांची मुदत महत्त्वाची

कोकण विभागीय उपनिबंधकांनी अहवाल सादर करण्यासाठी दिलेली १५ दिवसांची मुदत महत्त्वाची मानली जात आहे. संबंधित चौकशी अहवालात प्रशासकीय निर्णय, कामकाजाची वस्तुस्थिती आणि चौकशीच्या कक्षेत येणाऱ्या बाबींचा आढावा घेतला जाण्याची अपेक्षा आहे.

मात्र, चौकशी अहवाल प्राप्त होण्यापूर्वी प्रशासकांच्या कारभारात कोणतीही अनियमितता झाली आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. अहवालातील निष्कर्षांनंतरच या प्रकरणाचे अधिक स्पष्ट चित्र समोर येऊ शकेल.

पुढील कार्यवाहीकडे सर्वांचे लक्ष

बाजार समितीच्या कामकाजात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व राखण्याच्या दृष्टीने या चौकशीकडे पाहिले जात आहे. संबंधित अहवाल कोकण विभागीय सहनिबंधकांकडे सादर झाल्यानंतर त्यावर कोणती भूमिका घेतली जाते आणि पुढील प्रशासकीय कार्यवाही काय होते, याकडे बाजार समिती सदस्यांचे लक्ष लागले आहे.

चौकशी समितीच्या निर्णयाबाबत बाजार समिती सदस्यांनी समाधान व्यक्त केले असून, आता १५ दिवसांत सादर होणाऱ्या अहवालाकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झाले आहे.

तीन सदस्यीय चौकशी समिती नियुक्त

प्रसिद्ध झालेल्या वृत्तानुसार, या प्रकरणाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्यात आली आहे. समितीचे अध्यक्ष माणिक सांगळे असून, रत्नागिरीचे उपनिबंधक राम कुलकर्णी आणि कल्याणचे उपनिबंधक सर्जेराव कांदळकर यांचा सदस्य म्हणून समावेश आहे.

आमदार किसन कथोरे यांच्या तक्रारीनंतर चौकशी

मुरबाड विधानसभा मतदारसंघाचे आमदार किसन कथोरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे कल्याण कृषी उत्पन्न बाजार समितीच्या तत्कालीन प्रशासकांच्या निर्णयांविषयी तक्रारी केल्या होत्या.


या तक्रारींमध्ये बाजार समितीच्या सुमारे ५० गुंठे भूखंडाच्या वाटपाचा निर्णय, कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्याची प्रक्रिया आणि प्रशासकीय खर्चासंबंधी मुद्द्यांचा समावेश आहे. हे सर्व आरोप चौकशीच्या अधीन असून अद्याप सिद्ध झालेले नाहीत.

आमदार कथोरे यांनी या प्रकरणाचा मुद्दा आगामी विधिमंडळ अधिवेशनात उपस्थित करण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे चौकशी समितीच्या अहवालाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

नीड २४ न्यूज महाराष्ट्र.

— Kashinath Desale, ठाणे

छत्रपती संभाजीनगर: २१ वर्षीय पुरुषावर १९ वर्षीय तरुणीने शाळा केली, सिडको पोलिसांनी अटक




छत्रपती संभाजीनगरमध्ये शनिवारी (२१ नोव्हेंबर) रात्री ८ वाजता सिडको एम २ रोडवर २१ वर्षीय पुरुष आणि १९ वर्षीय तरुणी भेटले. पुरुषाने इन्स्टाग्रामवरून तरुणीला त्रास दिला आणि थेट प्रेमाची मागणी केली.

तरुणीने पुरुषाला भेटण्यासाठी होकार दिला, परंतु भेटताच तिने पुरुषाला शाळा केली. तिने पुरुषाला ३ मावस-आतेभावांनी एंट्री केली आणि त्याच्यासह त्याची दुचाकी व मोबाइल सिडको पोलिसांच्या ताब्यात दिले. तपासाची सुरुवात केली आणि संशयित पुरुषाविरुद्ध गुन्हा दाखल केला. पोलिसांच्या म्हणण्यानुसार, पुरुषाला अटक करण्यात आली आणि त्याच्यावर ताबडतोब आरोप लावण्यात आले.

— Sayeed Shareq Sayeed Khaleq

अपराध

पंचायत समितीमध्ये जादूटोणा, अधिकाऱ्यांच्या टेबलावर ठेवले लिंबू आणि धमकी वजा चिट्ठी



भोर मधील पंचायत समितीच्या कार्यालयात सहाय्यक अधिकारी यांच्या टेबलावर अज्ञात इसमाने काळी जादू केल्याचा प्रकार आज सकाळी उघडकीस आला. यावेळी त्यांच्या टेबलावर ठेवलेल्या लिंबूत हळद-कुंकू गुलाल अशा साहित्याचा वापर करून त्याखाली एक टाईप केलेली चिठ्ठी होती, याला धमकी वजा पत्र म्हणता येईल. या पत्रात असे लिहिले होते की "मी माझ्या गुरुंना कष्टात पाहू शकत नाही. माझे गुरु त्यांच्या साधनेतून त्यांना मिळालेल्या सिध्दीचा वापर कोणाच्याही वाईटासाठी करणार नाहीत. अगदी त्यांना कोणीही कितीही त्रास दिला तरी पण मी त्यांना असे पाहू शकत नाही. त्यांना झालेल्या त्रासाच्या प्रत्येक क्षणाचा हिशोब चुकता केला जाईल. माझ्या गुरुंच्या चांगुलपणाचा तु गैरफायदा घेतलास. तुझ्यामुळे त्यांची साधना भंग झालीय. त्यामुळे त्यांच्यासह माझ्या सर्व सहकारी बंधूवर त्याचा परिणाम झालाय. ते स्वतः काही करणार नाहीत पण मी व माझे सहकारी तुला सोडणार नाही. येथून पुढे तुझे कष्टाचे दिवस सुरु झालेत. तुला जगूही देणार नाही व मरुही देणार नाही. शारिरिक व्याधींनी तुझे पुर्ण शरीर पोखरले जाईल. तुझ्या ताटातील खाणारा तयार झालाय. साम दाम दंड भेद सर्वांचा वापर होईल. आम्हाला येणाऱ्या सर्व तांत्रिक सिध्दींचा वापर होईल. येथून पुढे तुझा एकही दिवस सुखाने जाणार नाही. तु केलेल्या सर्व कृत्यांचा हिशोब घेणेची वेळ आलीय. वाईटातल्या वाईटासाठी तयार रहा, सर्वनाशासाठी तयार रहा." यानंतर सदर अधिकाऱ्यांनी या गोष्टीबाबत भोर पोलिस स्टेशन मध्ये अज्ञात इसमाविरुद्ध तक्रार दाखल केली आहे. यावेळी गटविकास अधिकारी चंद्रकांत विपट यांच्याशी त्यांनी सदर घटना घृणास्पद आणि निंदनीय असल्याचे व अशा प्रकारची जादूटोणा, काळी जादू अधिकाऱ्यांवर करणे म्हणजे एक निंदनीय बाब असल्याचे सांगितले. आमच्या प्रतिनिधींनी येथील सीसीटीव्ही बाबत विचारले असता त्यांनी सीसीटीव्ही बंद असल्याची माहिती दिली व लवकरच सीसीटीव्ही बसवण्यात येतील असे त्यांनी सांगितले.

— किरण सदाशिव आंबिके

डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूट मंद्रूपला ‘सर्वोत्कृष्ट संगणक संस्था २०२६’ पुरस्कार *मंद्रूपच्या शिरपेचात मानाचा तुरा; सभेत अभिजीत व अविनाश जवळकोटे यांच्या कार्याचे एमकेसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विशेष कौतुक*



डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूट मंद्रूपला ‘सर्वोत्कृष्ट संगणक संस्था २०२६’ पुरस्कार

मंद्रूपच्या शिरपेचात मानाचा तुरा; सभेत अभिजीत व अविनाश जवळकोटे यांच्या कार्याचे एमकेसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून विशेष कौतुक

ग्रामीण भागातून एमएस-सीआयटी व टॅली या संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रमांसाठी ३५० हून अधिक विद्यार्थ्यांची प्रवेश नोंदणी करून मंद्रूप येथील डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूटने ग्रामीण भागातून जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविण्याचा बहुमान पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल संस्थेला *‘सर्वोत्कृष्ट संगणक संस्था २०२६’* या प्रतिष्ठित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शुक्रवार, दि. २० नोव्हेंबर रोजी सोलापूर येथील निर्मलकुमार फडकुले सभागृहात आयोजित एमकेसीएलच्या वार्षिक सभेत हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

संस्थेचे संचालक अभिजीत जवळकोटे व उपसंचालक अविनाश जवळकोटे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. यावेळी एमकेसीएलचे वरिष्ठ अधिकारी अतुल पतोडी, अमित रानडे, विभागीय समन्वयक महेश पत्रिके, जिल्हा समन्वयक मीरा जेऊरकर मॅडम, रोहित जेऊरकर, मलिक शेख, राहुल बारावकर , अलोक मालू ,शिवानंद पाटील , यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच सोलापूर जिल्ह्यातील २०० हून अधिक संगणक प्रशिक्षण केंद्रचालकांची उपस्थिती होती.

या वार्षिक सभेत अभिजीत जवळकोटे व अविनाश जवळकोटे यांनी मंद्रूप व परीसारतील खेडेगावातील विद्यार्थ्यांना संगणक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याचे एमकेसीएलच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष कौतुक केले.

डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूटच्या माध्यमातून मंद्रूप व परिसरातील ग्रामीण विद्यार्थ्यांना एमएस-सीआयटी, टॅली यांसह विविध संगणक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे दर्जेदार शिक्षण दिले जाते. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना संगणक साक्षर बनविण्यासाठी संस्थेचे संचालक अभिजीत जवळकोटे व उपसंचालक अविनाश जवळकोटे सातत्याने प्रयत्नशील आहेत.

विद्यार्थ्यांचा वाढता प्रतिसाद, गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण आणि सातत्यपूर्ण मेहनतीच्या जोरावर संस्थेने एमएस-सीआयटी व टॅली अभ्यासक्रमांसाठी ३५० हून अधिक प्रवेश नोंदवून ग्रामीण भागातून सोलापूर जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविला. या यशाची दखल घेत एमकेसीएलने संस्थेचा गौरव केला.

ग्रामीण भागात राहूनही संगणक शिक्षण क्षेत्रात जिल्हास्तरावर मिळविलेले हे यश मंद्रूपसह संपूर्ण दक्षिण सोलापूर तालुक्यासाठी अभिमानाची बाब ठरली आहे. या पुरस्काराबद्दल संस्थेचे संचालक अभिजीत जवळकोटे व उपसंचालक अविनाश जवळकोटे यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत आहे.

डी. एस. कमळे गुरुजी कम्प्युटर इन्स्टिट्यूट मंद्रूपला ‘सर्वोत्कृष्ट संगणक संस्था २०२६’ पुरस्कार प्रदान करताना एमकेसीएलचे वरिष्ठ अधिकारी अतुल पतोडी ,अमित रानडे , जिल्हा समन्वयक रोहित जेऊरकर , मीरा जेऊरकर , महेश पत्रिके , अलोक मालू , राहुल बारावकर, आदि

— YALLAPPA RAGATE (PATIL)

स्थानीय

रिक्षा चालकांचे सोमवारचे आंदोलन: मागण्या व आरटीओला सादर केलेले निवेदन



रिक्षा चालक संघटनेने आज सोमवारला राज्यव्यापी आंदोलन आयोजित केले. चालकांनी त्यांच्या तात्काळ मागण्या मांडून रस्त्यांवर प्रदर्शन केले.

संघटनेने रिक्षा चालकांच्या कामकाजातील अडचणींवर लक्ष वेधून घेण्याची आणि सुधारणा करण्याची हाक दिली. त्यांनी रिक्षा चालकांच्या हक्कांचे रक्षण व कामाच्या अटी सुधारण्याची मागणी केली.


या आंदोलनादरम्यान रिक्षा चालकांच्या प्रतिनिधींचे विविध संघटनांशी समन्वय साधून, संबंधित विभागीय परिवहन कार्यालय (आरटीओ) ला औपचारिक निवेदन सादर केले. निवेदनात चालकांच्या तक्रारी व सुधारणा प्रस्ताव स्पष्टपणे मांडले गेले आहेत.

उपाययोजना अपेक्षित असल्याचे अधोरेखित केले, तसेच भविष्यातील कोणत्याही अडचणी टाळण्यासाठी संवाद साधण्याची इच्छा व्यक्त केली.

— G. P. G. U. .7798377959

अपराध

भोर पंचायत समिती कार्यालयात जादूटोण्याचा प्रकार; लिंबू अंगाऱ्यांसह अधिकाऱ्यांच्या टेबलावर धमकीची चिठ्ठी


मी माझ्या गुरुंना कष्टात पाहू शकत नाही माझे गुरु त्यांच्या साधनेतून त्यांना मिळालेल्या सिध्दीचा वापर कोणाच्याही वाईटासाठी करणार नाहीत अगदी त्यांना कोणीही कितीही त्रास दिला तरी पण मी त्यांना असे पाहू शकत नाही त्यांना झालेल्या त्रासाच्या प्रत्येक क्षणाचा हिशोब चुकता केला जाईल माझ्या गुरुंच्या चांगुलपणाचा तु गैरफायदा घेतलास. तुझ्यामुळे त्यांची साधना भंग झालीय. त्यामुळे त्यांच्यासह माझ्या सर्व सहकारी बंधूवर त्याचा परिणाम झालाय. ते स्वत: काही करणार नाहीत पण मी व माझे सहकारी तुला सोडणार नाही. येथून पुढे तुझे कष्टाचे दिवस सुरु झालेत. तुला जगूही देणार नाही व मरुही देणार नाही. शारिरिक व्याधींनी तुझे पुर्ण शरीर पोखरले जाईल. तुझ्या ताटातील खाणारा तयार झालाय. साम दाम दंड भेद सर्वांचा वापर होईल. आम्हाला येणाऱ्या सर्व तांत्रिक सिध्दींचा वापर होईल. येथून पुढे तुझा एकही दिवस सुखाने जाणार नाही. तु केलेल्या सर्व कृत्यांचा हिशोब घेणेची वेळ आलीय. वाईटातल्या वाईटासाठी तयार रहा, सर्वनाशासाठी तयार रहा.

भोर येथील पंचायत समिती कार्यालयात एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. अधिकाऱ्यांच्या टेबलावर लिंबू कापून त्यावर हळद-कुंकू आणि गुलाल टाकण्यात आला आहे. विशेष म्हणजे, या लिंबाखाली एक धमकीवजा चिठ्ठी देखील ठेवण्यात आली आहे.

पंचायत समिती कार्यालयात असा जादूटोण्याचा प्रकार प्रथमच समोर आल्याने सर्वत्र खळबळ उडाली आहे. या घटनेमुळे कार्यालयातील कर्मचाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. या प्रकाराची माहिती मिळताच संबंधित अधिकाऱ्यांनी तातडीने पोलिसांत तक्रार दाखल करण्यासाठी धाव घेतली आहे.

या घटनेचा सविस्तर आढावा आमचे भोरचे प्रतिनिधी किरण अंबिके यांनी घेतला आहे. पोलीस या प्रकरणाचा तपास करतील, यामागे कोणाचा हात आहे याचा शोध घेण्याचा प्रयत्न करत आहेत.

— किरण सदाशिव आंबिके

कृषि

भोर तालुक्यात हर्णस गावात पशुपालकांसाठी चारा व पिक बियाणे प्रशिक्षण कार्यशाळा



भोर तालुका, पुणे जिल्ह्यातील हर्णस गावात दुष्काळ परिस्थितीचा विचार करून पशुपालक शेतकऱ्यांसाठी चारा साक्षरता प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

पुणे जिल्हा परिषद सदस्य विक्रम खुटवड आणि पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ही कार्यशाळा घेण्यात आली, ज्यात शेतकऱ्यांना मका पिक बियाणे वितरित करण्यात आले.

कार्यशाळेत भाताच्या पेंढ्या, सोयाबीनचा भुस्सा, गव्हाचा भुस्सा इत्यादींची प्रक्रिया करून जनावरांसाठी सकस आहार तयार करण्याचे प्रात्यक्षिक दाखवले; पशुसंवर्धन सहायक आयुक्त डॉ. किशोर मुळे विविध विषयांवर मार्गदर्शन केले.

योग्य चारा नियोजन व उत्पादनामुळे दुध देण्याची क्षमता व जनावरांची वाढ सुधारेल, आणि दुष्काळाच्या काळात चारा टंचाई टाळता येईल, असे शेतकऱ्यांना सांगितले.

— किरण सदाशिव आंबिके

द रिअल पँथर ऑफ इंडिया ने जिल्हा सरचिटणीस अमित भाऊ मोरे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या



द रिअल पँथर ऑफ इंडिया ने जिल्हा सरचिटणीस अमित भाऊ मोरे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

अमित भाऊ मोरे हे जिल्हा सरचिटणीस आहेत.

या शुभेच्छा त्यांच्या योगदान आणि सेवेसाठी दिल्या गेल्या.

— Amit Suresh More

राजनीति

महाराष्ट्रातील दुष्काळ नियोजनशून्य सरकारमुळे; आनंदराज आंबेडकरांची घणाघाती टीका



जालना : महाराष्ट्रात भरपूर पाऊस पडत असतानाही पावसाचे पाणी साठवून ठेवण्याचे योग्य नियोजन होत नसल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण होत आहे. हा नैसर्गिक दुष्काळ नसून सरकारच्या नियोजनशून्य कारभाराचा परिणाम असल्याची घणाघाती टीका रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी केली आहे.

रिपब्लिकन सेनेच्या २८ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यकर्त्यांच्या धोरणांमध्ये बदल होत नाही, तोपर्यंत ही परिस्थिती कायम राहणार असल्याचे सांगत त्यांनी सरकारच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

मराठवाड्यातील ग्रामीण भागात जनावरांच्या चाऱ्याचा आणि पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या प्रश्नांवर सरकारने तातडीने उपाययोजना कराव्यात, तसेच तरुणांनी पिढ्यानपिढ्या चालत आलेल्या परिस्थितीत अडकून न पडता शिक्षणाची वाट धरावी आणि स्वाभिमानाने जीवन जगावे, असे आवाहन आंबेडकर यांनी केले.

दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी शासनाने ठोस नियोजन करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास थांबवून जलसंधारणाच्या उपाययोजना राबविणे, आर्थिक विकास महामंडळाच्या कर्जांसह मायक्रो फायनान्स कंपन्या व बचत गटांच्या कर्जासंदर्भात योग्य निर्णय घेणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

पाऊस पडूनही पाणीटंचाई आणि दुष्काळाचा सामना करावा लागत असेल, तर ही केवळ निसर्गाची समस्या नसून नियोजन आणि अंमलबजावणीवरही गंभीर प्रश्न उपस्थित करणारी परिस्थिती आहे, असे मत आंबेडकर यांनी व्यक्त केले.

— Prashant Pradhan

राजगड तालुक्यात 101 कोटी 15 लक्ष रुपयांच्या विकास कामांचे आमदार शंकर मांडेकर यांच्या हस्ते भूमिपूजन



राजगड तालुक्यात स्थानिक आमदार शंकर मांडेकर यांच्या नेतृत्वाखाली 101 कोटी 15 लक्ष रुपयांच्या विकास प्रकल्पाची भूमिपूजन समारंभ पार पडला. या भरीव निधीतून होणाऱ्या कामांमुळे ऐतिहासिक आणि दुर्गम अशी ओळख असलेल्या राजगड तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला मोठी चालना मिळणार आहे. या निधीअंतर्गत तालुक्यातील विविध रस्ते, साकव पूल, आरोग्य केंद्र, सभामंडप बांधणे, मंदिर सुधारणा, पाणीपुरवठा आणि इतर महत्त्वाच्या पायाभूत सुविधांची कामे हाती घेण्यात येणार आहेत. आमदार शंकर मांडेकर यांच्या मागणी आणि पाठपुराव्यानुसार राजगड तालुक्यामध्ये हा 101 कोटी 15 लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकासकामांसाठी निधी मंजूर करून आणला आहे. या कामांमुळे दळणवळण सुलभ होणार आहे आणि ग्रामीण भागातील नागरिकांचे जीवनमान उंचावण्यास मदत होणार आहे. या कार्यक्रमाला तालुक्यातील विविध विभागांचे प्रशासकीय अधिकारी, स्थानिक लोकप्रतिनिधी, सरपंच, उपसरपंच, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

स्थानीय

राष्ट्रीय महामार्ग 930 वरील मोठे खड्डे व अंधार नदीवरील अपूर्ण पुलावर तातडीची कारवाईची मागणी – मूल-चंद्रपूर मार्गात जीवघेणी स्थिती



महाराष्ट्रातील मूल ते चंद्रपूर दरम्यान राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 930 वर निर्माण झालेल्या मोठ्या खड्डे व अर्धवट पुलामुळे वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न उभा राहिला आहे. या रस्त्यावरील स्थितीला पाच वर्षांहून अधिक काळ कोणतीही सुधारात्मक कारवाई न झाल्यामुळे जनतेत वाढती असंतोषाची भावना दिसून येते.

जंगल बार अँड रेस्टॉरंट परिसरात महामार्गाच्या डाव्या बाजूला व मूल-चंद्रपूर मार्गाच्या उजव्या बाजूला मोठे खड्डे पडले आहेत. या खड्ड्यांमुळे वाहने धडकण्याचा धोका वाढला असून चालकांना वारंवार त्रास सहन करावा लागतो. समस्येबाबत संबंधित अधिकाऱ्यांना अनेक वेळा निवेदन दिले असले तरी खड्डे बुजविण्यासाठी कोणतीही ठोस पावले उचलली गेली नाहीत.

अपूर्ण आहे. जुनी रचना पाहता हा पूल कधी कोसळेल याची भीती नागरिकांमध्ये पसरली आहे, तर दररोज या मार्गावर शेकडो वाहने ये-जा करतात. या परिस्थितीत कोणतीही आपत्कालीन सूचना फलक किंवा सुरक्षा व्यवस्था नसल्यामुळे अपघाताचा धोका अधिक वाढला आहे.

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणातील प्रफुल्ल केलेकर, आशीष घोमडे आणि नितीन घोनमोडे यांना या समस्यांकडे त्वरित लक्ष देण्याची मागणी केली जात आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की शासकीय संपर्क क्रमांकावरही फोन उचलला जात नाही, ज्यामुळे सार्वजनिक सेवकांच्या जबाबदारीबद्दल प्रश्न निर्माण होतो.

जिल्हा प्रशासन व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने खड्डे तातडीने बुजवणे, अंधार नदीवरील अपूर्ण पुलाचे पूर्ण बांधकाम, तांत्रिक तपासणी व सुरक्षा फलकांची स्थापना यांसारखी सर्व मागण्या अंमलात आणावी, अन्यथा भविष्यातील मोठ्या दुर्घटनेची जबाबदारी कोणी घ्यावी लागेल, हा प्रश्न जनतेकडून सतत विचारला जात आहे.

— Doctor Pintu Paul

सोलापूरच्या पुणे रोडवर वाहतूक पोलिसांची लाचखोरीचा व्हिडिओ व्हायरल



सोलापूरच्या पुणे रोडवर वाहतूक पोलिसांनी पैसे घेतल्याचा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यामुळे लाचखोरीचा आरोप उभा राहिला.

व्हिडिओमध्ये पोलिस अधिकाऱ्याने वाहन चालवणाऱ्या चालकाकडून रक्कम स्वीकारताना दिसते, आणि त्याच वेळी इतर वाहतूक नियंत्रण कार्ये थांबवली जात असल्याचे दिसते.

घटनेनंतर स्थानिक नागरिकांनी लाचखोरीविरुद्ध कठोर कारवाईची मागणी केली आहे.

व्हायरल व्हिडिओने सार्वजनिक चर्चा निर्माण केली असून, सामाजिक माध्यमांवर लाचखोरीविरुद्धचा असंतोष व्यक्त केला जात आहे.

— YALLAPPA RAGATE (PATIL), सोलापुर

बहुजन मुक्ती पक्षाने 23 नोव्हेंबरला तुलसीवाडी धरण प्रदूषणावरील घर बचाव आंदोलनाची घोषणा, नाना चौक, मुंबई येथे



23 नोव्हेंबर 2026 (सोमवार) रोजी बहुजन मुक्ती पक्षाने तुलसीवाडी धरणातील प्रदूषण आणि पूर्ण विकास प्रकल्पाबाबत आपली चिंता व्यक्त केली आणि तत्काळ कारवाईची मागणी केली.

ही घोषणा मुंबईच्या नाना चौक येथे करण्यात आली, जिथे पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम साहेब उपस्थित होते. त्यांनी "बामसेफ घर बचाव आंदोलन" सुरू करण्याची घोषणा केली.

पक्षाचे मत आहे की धरणातील प्रदूषण स्थानिक रहिवाशांच्या जीवनावर व पर्यावरणावर गंभीर परिणाम करेल, म्हणूनच घर बचावासाठी आंदोलनाची गरज निर्माण झाली आहे.

आंदोलनाचे उद्दिष्ट स्थानिक लोकसंख्येचे संरक्षण करणे आणि संबंधित अधिकाऱ्यांकडून त्वरित उपाययोजना मिळवणे आहे.

— G. P. G. U. .7798377959, मुंबई